# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**जिल्हा शासकिय रुग्णालय (जि. रत्नागिरी) येथे विविध संवर्गातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(१) १४१५ (२३-१२-२०१४). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा शासकिय रुग्णालय (जि.रत्नागिरी) येथे विविध संवर्गातील १०३ पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध संवर्गातील मंजूर ४०६ पदांपैकी १०३ पदे रिक्त असून केवळ ५ सर्जन उपलब्ध असून १४ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार उक्त रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) : (१)** हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथील वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गातील माहे एप्रिल २०१८ अखेर मंजूर, भरलेल्या व रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी गट अ (वर्ग-१) | १९ | ०३ | १६ |
| २ | वैद्यकीय अधिकारी गट अ (वर्ग-२) | ३५ | २८ | ०७ |
| ३ | गट क | २१५ | १४३ | ७२ |
| ४ | गट ड | १४९ | ११५ | ३४ |
| | **एकूण** | ४१८ | २८९ | १२९ |

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.
४१८ पदांपैकी १२९ पदे रिक्त असून वैद्यकीय अधिकाऱ्यांची २३ पदे रिक्त आहेत. एनआरएचएम अंतर्गत करार तत्वावर भिषक-१, भूलतज्ञ, ऑनकॉल तत्वावर, बालरोगतज्ञ -२ व स्त्रीरोगतज्ञ पूर्णवेळ १ कार्यरत आहेत .
(४) गट अ व गट-ब ची रिक्त पदे MPSC व शासन स्तरावरुन व जिल्हाधिकाऱ्यामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे. वैद्यकीय गट अ ची ७२३ रिक्त पदे भरणेबाबत दि.१२.७.२०१८ रोजी पदभरती जाहिरात दैनिक वृत्तपत्रात देण्यात आली आहे. गट क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याची दि.२०.५.२०१८ रोजी उपसंचालक, कोल्हापूर मंडळ यांचे स्तरावर परिक्षा घेण्यात आली. पदभरती संबंधीत पुढील कार्यवाही सुरु आहे. गट ड ची पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कशेळे (ता.कर्जत जि.रायगड) येथील ग्रामीण रुग्णालयासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळणेबाबत**

**(२) ४६६० (२३-१२-२०१४). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कशेळे (ता.कर्जत जि.रायगड) येथील ग्रामीण रुग्णालयासाठी २५ वर्षापूर्वी जमीन देणेच्या मोबदल्यात संबंधित शेतक-यांच्या कुटूंबातील प्रत्येकी एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घेण्याचे आश्वासन आरोग्य विभागाकडून देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शेतक-यांनी मे महिन्यात उपोषण सुरु केले असतांना उपोषणाच्या चौथ्या दिवशी आरोग्य विभाग व महसूल विभाग यांनी रुग्णालय परिसरातील वापरात नसलेली जमिन शेतक-यांना परत देण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आश्वासन देऊनही पाच महिन्याचा कालावधी उलटूनही अद्याप शेतक-यांना जमिनी परत देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
शेतक-यांनी जमीनीच्या मोबदल्यात मुलास/मुलीस शासकीय नोकरीत सामावून घेण्यासाठी उपोषणाची नोटीस दिली होती. परंतू आरोग्य विभागाच्या अधिका-यांनी सदर उपोषण मागे घेण्याची विनंती केल्यानंतर उपोषण मागे घेतले आहे. घेतलेली जमीन परत देण्याबाबत आश्वासन दिल्याची नोंद आढळून येत नाही.
(३) व (४) आणि (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरी (जि. नांदेड) येथील ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याबाबत**

**(३) १७१९८ (१४-०८-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी (जि.नांदेड) येथील ग्रामीण रुग्णालय सन १९८० साली स्थापन झाले असुन तत्कालीन लोकसंख्या, उपलब्ध साधने, प्रगत तंत्रज्ञान या सर्व बाबी लक्षात घेता आजघडीला त्यात खूप बदल झाला असुन चार तालुक्यांना जोडणाऱ्या या रुग्णालयाकडे शासनाने दुर्लक्ष केले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याबाबत तसेच प्रगत तंत्रज्ञानाचे सुसज्ज करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) : (**१) हे खरे नाही.

(२) व (३) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्यासंबंधी जोडबृहत आराखडा तयार करण्यात येत असून, ग्रामीण रुग्णालय, उमरी चे श्रेणीवर्धन करण्याची मागणी, निकषानुसार जोडबृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**भारज बु.(जि.जालना) येथील रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४) २३८१८ (१७-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारज बु. (जि.जालना) येथे जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्यावतीने सर्वसामान्य गोरगरीब जनतेला आरोग्य सेवा मिळावी यासाठी नागरी दवाखान्याची भव्य व सुसज्ज इमारत उभारण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथे गेल्या एक वर्षापासून वैद्यकीय अधिका-यांचे पद रिक्त असल्याने परिसरातील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांना बाहेरगावी जाऊन खाजगी दवाखान्यात उपचार घ्यावे लागत असल्याने त्यांना नाहकचा आर्थिक भुर्दड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तदनुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) नागरी दवाखाना भारज बु.(जि.जालना) येथे वैद्यकीय अधिकारी संवर्गाचे एक पद मंजूर आहे. सदर पदावर दि.२८.०५.२०१५ पासुन एक वैद्यकीय अधिकारी रुजु झाले होते. त्यांनी दि.१६.०९.२०१५ रोजी राजीनामा दिला. तेव्हा तेथील पदाचा अतिरिक्त कार्यभार तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे देण्यात आला होता. याठिकाणी नियमित वैद्यकीय अधिकारी दि.०१.१२.२०१५ पासुन कार्यरत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारंजा लाड (जि.वाशीम) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(५) ३६१७६ (२१-०१-२०१६). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा लाड (जि.वाशीम) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये विविध सुविधांचा अभाव तसेच रुग्णांची गैरसोय होत असल्याची माहिती मिळाल्यावर स्थानिक लोकप्रतिनिधींनी अचानक या रुग्णालयास भेट दिल्यावर सदर सुविधेंचा अभाव व रुग्णांची गैरसोय होत असल्याची बाब निदर्शनास आली असल्याने संबंधीत विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांना त्वरित सदर सुविधा देण्याचे व गैरसोय दूर करण्याचे निर्देश दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांना दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयास सुविध देण्यास व गैरसोय दूर करण्याबाबत संबंधीत अधिका-यांनी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, अद्याप कोणतीच उपाययोजना न करण्याची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) दि.०५.१०.२०१५ रोजी लोकप्रतिनिधींनी कारंजा लाड येथे दिलेल्या भेटीदरम्यान त्यांच्या निर्देशानुसार वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय, कारंजा लाड, जि. वाशिम ह्यांना ग्रामीण रूग्णालय येथे सुविधा देण्याचे व गैरसोय दूर करण्याबाबतजिल्हा शल्य चिकित्सक वाशिम यांनी आदेशित केले असून त्यानुसार उपाय योजना करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बसंबा उपकेंद्रात (जि.हिंगोली) वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाची नियुक्ती करण्याबाबत**

**(६) ३८४४० (१०-०१-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बसंबा (जि.हिंगोली) येथे शासनातर्फे ९३ लाख रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या उपकेंद्रात एकही वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाची नियुक्ती करण्यात आली नसल्यामुळे हे रुग्णालय बंदच आहे यामुळे रुग्णांना आरोग्य सेवा मिळत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप उपाययोजना केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
हिंगोली जिल्हयातील मौजे बसंबा उपकेंद्राच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून सदर उपकेंद्र नवीन इमारतीत चालू आहे. सदर उपकेंद्रात खालील पदे मंजूर आहेत :-

| संवर्ग | मंजूर | भरलेली | रिक्त | शेरा |
|---|---|---|---|---|
| आरोग्य सेवक | २ | १ | १ | दि.१७.१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये १ आरोग्य सेविका व १ आरोग्य सेवक अशी २ अतिरिक्त पदे मंजूर आहेत. तसेच एन.एच.एम.अंतर्गत १ कंत्राटी आरोग्य सेविका कार्यरत आहे. |
| आरोग्स सेविका | ३ | २ | १ | |
| अंशकालीन स्त्री परिचर | १ | १ | १ | |
| **एकूण** | ६ | ४ | २ | |

सदर कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णांना आरोग्य सेवा देण्यात येते.
(२) राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत या उपकेंद्रात कंत्राटी वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस) चे १ पद मंजूर करण्यात आले आहे व सदर पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) कार्यवाही सुरु आहे.

---

**देवरुख (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदांबाबत**

**(७) ४४०४६ (१०-०५-२०१६). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवरुख (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयात रिक्त पदांमुळे रुग्णांची गैरसोय होत असताना रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी गेले दोन वर्षे सलग रजेवर असल्याने याचा त्रास सर्वसामान्य रुग्णांना सहन करावा लागत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अधिकाऱ्याच्या जागेवर अन्य अधिकारीदेखील देण्यात आलेले नाहीत किंवा सलग रजेवर गेलेल्या अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दोन वर्षांपूर्वी नियुक्त करण्यात आलेल्या या दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात येऊनही शासन स्तरावर देखील अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आरोग्य विभागाच्या गैरकाराभाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी संबंधित मंत्रीमहोदयांच्या निदर्शनास आणले असतानाही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तदनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

देवरूख (जि.रत्नागिरी) ग्रामिण रूग्णालय येथे वैद्यकीय अधिकाऱ्यांची ३ पदे मंजुर असून तीनही पदे भरण्यात आलेले आहेत. तथापी, सदर ३ वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी २ अनधिकृत गैरहजर असून १ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे. तसेच आयुष योजनेंतर्गत एक वैद्यकीय अधिकारी व शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमांतर्गत चार वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून त्यांच्या मार्फत रूग्णांना आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

अनधिकृत गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करण्याचा प्रस्ताव संचालनालय स्तरावर प्रस्तावित आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) अनधिकृत गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

### पारे (ता.खानापूर जि. सांगली) या डोंगरी विभागात असणाऱ्या गावात प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याबाबत

**(८) ४५३४९ (११-०५-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारे (ता.खानापूर जि. सांगली) या डोंगरी विभागात असणाऱ्या गावात प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र नसल्याने स्थानिक नागरिकांची अत्यंत गैरसोय निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय?
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.
विटा, ता.खानापूर येथे ग्रामीण रुग्णालय सुरु झाल्याने येथील प्राथमिक आरोग्य केंद्र नजिकच्या परिसरात स्थलांतरीत करण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इंडियन नर्सिंग कौन्सिलच्या निकषाप्रमाणे शहरी भागात तीन रुग्णामागे एक तर ग्रामीण भागात चार रुग्णामागे एक परिचारिका या आदेशाबाबत**

**(९) ४८३०१ (११-०५-२०१६). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इंडियन नर्सिंग कौन्सिलच्या निकषाप्रमाणे शहरी भागात तीन रुग्णामागे एक तर ग्रामीण भागात चार रुग्णामागे एक परिचारिका असे आदेश प्रमाणित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असे असतानाही सध्या मुंबईतील रुग्णालयामध्ये एक परिचारिका सरासरी २५ रुगणांची काळजी घेते तर ग्रामीण भागात यांचे प्रमाण दुप्पट आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यभरातील सरकारी, ईएसआयएस आदि रुग्णालयामध्ये परिचारिकांची सुमारे दीड हजार पदे रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरची रिक्त पदे अद्यापपर्यंत न भरण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, ही रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) अंशत: खरे आहे.
अधिपरिचारीकांच्या रिक्त पदांसाठी भरती प्रक्रियां आयोजित करण्यात आलेली होती व पूर्ण करुन नियुक्ती देण्यात आली आहे. व कोल्हापूर मंडळ वगळता भरती प्रक्रिया पुर्ण झाली आहे. कोल्हापूर मंडळाची भरती परिक्षा दि.२० मे २०१८ रोजी घेण्यात आली असून त्यानुसार भरती प्रक्रियेची पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच बंधपत्रीत अधिपरिचारीकडून ११ महिन्यांच्या करार पध्दतीने रिक्त पदी पदस्थापना देऊन रुग्णसेवा देण्यात येते.

---

**खोलापूर (ता.भातुकली, जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची झालेली दुरावस्था**

**(१०) ५६०२३ (३०-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोलापूर (ता.भातुकली, जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील समस्या सोडविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना दिनांक ६ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरवस्था सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) नाही.

सदर निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) दि. २५.०१.२०१६ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र खोलापूर येथील नवीन इमारत व निवासस्थान उपअभियंता, बांधकाम उपविभाग क्र.२, जिल्हा परिषद, अमरावती यांच्या मार्फ़त वैद्यकीय अधिकारी यांच्या ताब्यात देण्यात आलेली आहे. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात शस्त्रक्रियागृह व इतर सुविधा अद्ययावत आहेत. तसेच पाण्यासाठी नवी बोअर निर्माण करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत सदरचे प्राथमिक आरोग्य केंद्र सुस्थितीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील उपजिल्हा रुग्णालय, परंडा व ग्रामीण रुग्णालय भूम व वाशी येथे सीटी स्कॅन मशिन व सोनोग्राफी मशिन उपलब्ध करुन देणेबाबत**

**(११) ६३५७३ (३०-०८-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय, परांडा व ग्रामीण रुगणालय भूम व वाशी येथील सोनोग्राफी मशिन नादुरुस्त असल्याने बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तालुक्यातून राष्ट्रीय महामार्ग जात असल्याने याठिकाणी अपघाताचे प्रमाण जास्त असल्याने अपघातग्रस्त रुग्णांना वेळेवर उपचार न मिळाल्याने त्यांच्या जिवीताला धोका निर्माण होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त उपजिल्हा रुग्णालय येथे सिटी स्कॅन मशिन तसेच सोनोग्राफी मशिन उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी मा.आरोग्य मंत्री यांना माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
उस्मानाबाद जिल्हयातील परंडा येथील उपजिल्हा रुग्णालयातील सोनोग्राफी मशीन बंद आहे. ग्रामीण रुग्णालयास निकषानुसार सोनोग्राफी मशीन अनुज्ञेय नसल्याने भूम व वाशी येथील ग्रामीण रुग्णालयास सोनोग्राफी मशीन देण्यात आल्या नाहीत.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) उपजिल्हा रुगणालय, परांडा येथील सोनोग्राफी मशीन १० वर्षापूर्वीची असल्याने ती दुरुस्त होऊ शकत नसल्याने मे.फेबर सिंदुरी यांनी कळविले असून त्यानुसार याठिकाणी नवीन सोनोग्राफी मशीन खरेदी करण्याबाबत नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये जिल्हापरिषदेकडे मागणी करण्यात आली होती. परंतु, निधी उपलब्ध झाला नाही. सन २०१८-१९ मध्ये जिल्हा वार्षिक योजना व निती आयोग अंतर्गत उपलब्ध अनुदानातून नवीन सोनोग्राफी मशीन खरेदी करण्याबाबतची मागणी करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्हयांतील जिल्हा सामान्य रुग्णालयातील पदे रिक्त असल्याबाबत

**(१२) ६८३५५ (१०-०१-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम येथील २०० खाटांच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात २५२ पैकी तब्बल १५० पदांचा अनुशेष असून ट्रॉमा केअर युनिट मध्ये १५ पैकी केवळ ३ पदे कार्यरत असून निवासी वैद्यकीय अधिकारी, शरिर विकृती तज्ञ, मनोविकृती तज्ञ, चर्मरोग तज्ञ, नेत्र तज्ञ, कान-नाक-घसा तज्ञ, अस्थी व्यंग तज्ञ, स्त्री रोग तज्ञ व प्रसुती तज्ञ यासारखी वर्ग-१ ची बारा पदे तसेच दंतचिकीत्सासह १० वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे बऱ्याच वर्षापासून रिक्त असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रिक्त पदामुळे रुग्ण सेवेवर त्याचा विपरीत परिणाम होत असून वाशिम येथील रुग्ण ८० कि.मी. अंतरावर अकोला येथे पाठविण्यात येत असल्यामुळे सदर रिक्त पदे भरण्यासंदर्भात जिल्हा शल्यचिकीत्सक, वाशिम यांच्याकडून वारंवार मागणी होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तज्ञ डॉक्टर अभावी, मानोरा, रिसोड, मंगरुळपीर ग्रामीण रुग्णालयातील एक्सरे मशीन विनावापर पडून असून मंगरुळपीर येथील सोनोग्राफी मशीन ही बंद आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सेलु बाजार प्राथमिक आरोग्य केंद्रातील बेबी केअर युनिट बंद आहे याशिवाय अनसिंग वारला येथील आरोग्य केंद्रांना स्वतंत्र इमारत उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वाशिम येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील वर्ग-१ व वर्ग-२ ची तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची व इतर रिक्त पदे भरण्याबाबत व जिल्ह्यातील आरोग्य विषयक सुविधांचा आढावा घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-१२-२०१८) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सामान्य रुग्णालय, वाशिम या रुग्णालयात एकूण २५२ पदे मंजूर असून त्यापैकी १४३ पदे भरण्यात आली आहे. तसेच ट्रामा केअर युनिट, वाशिम येथील १५ मंजूर पदांपैकी ५ पदे भरलेली आहे.

रुग्णालयातील विशेषज्ञाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वर्ग-२ वैद्यकीय अधिकाऱ्यांची १६ मंजूर पदे असून सर्व पदे भरलेली आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

वर्ग-२ संवर्गामधून वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरल्यामुळे रुग्णसेवेवर विपरीत परिणाम झालेला नाही. केवळ गुंतागुंतीचे रुग्णांनाच आवश्यकतेनुसार संदर्भीत केले जाते.

(३) होय अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, मानोरा येथील क्ष-किरण तंत्रज्ञ यांचे पद रिक्त आहे. ग्रामीण रुग्णालय, रिसोड येथील क्ष-किरण यंत्र निर्लेखित झाले असून, ग्रामीण रुग्णालय, तेल्हारा जि. अकोला येथील क्ष-किरण यंत्र कार्यान्वित करण्यात आले आहे.

मंगरुळपीर येथे नविन एक्सरे मशीन कार्यान्वित आले असून रुग्णांवर उपचार करण्यात येतो.

(४) होय, अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र , सेलु बाजार, जि वाशिम येथे एनएसएसके अंतर्गत १ वॉर्मर, फोटोथेरपी संचाचा उपयोग केला जातो.

अनसिंग येथील ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय सद्यस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्राचे इमारतीत कार्यान्वित असून, केंद्रास स्वतंत्र इमारतीचे बांधकामाकरिता जागा प्राप्त झालेली आहे. तसेच इमारतीकरिता सन २०१८-१९ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीमधून आठ कोटी तरतुद झाली आहे. सदर काम निविदास्तरावर आहे.

(५) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तसेच सोयीसुविधाबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.

गट-क व गट-ड संवर्गातील पदे भरण्यासाठी दि.८.०१.२०१७ व २२.१.२०१७ रोजी लेखी परिक्षेत निवड उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जिल्हयामधील आरोग्य संस्थेत सिटीस्कॅन सेंटर सुरु करण्याबाबत**

**(१३) ७३६२८ (१०-०१-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील २६ जिल्हयांमधील आरोग्य संस्थेत सामान्य जनतेसाठी सिटीस्कॅन सेंटर सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे;

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी किती कालावधीत होणे अपेक्षित आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे,

राज्यातील ३१ आरोग्य संस्थांमध्ये ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(२) व (३) मा.वित्तमंत्री यांनी दि.१८ मार्च, २०१७ रोजी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये राज्यातील निवडक ३१ रुग्णालयांमध्ये सी.टी. स्कॅन मशीन बसविणार अशी घोषणा केलेली आहे. त्यानुसार शासन निर्णय दि.१५.९.२०१७ अन्वये राज्यातील आरोग्य संस्थांकरिता ३१ नग सी.टी.स्कॅन मशीन खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे व उपलब्ध तरतूदीतून हाफकिन जीव- औषध निर्माण महामंडळ यांचे स्तरावरुन विहित कार्यपध्दती अवलंबून सी.टी.स्कॅन मशीन खरेदीचे आदेश दिनांक ३१/१०/२०१८ रोजी दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विक्रमगड (जि. पालघर ) ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदांबाबत**

**(१४) ७८३३८ (१८-०४-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (ता.विक्रमगड, जि. पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयात एकाच वैद्यकिय अधिकाऱ्यांवर संपूर्ण कामाचा ताण असून रुग्णालयातील अनेक रिक्त पदे भरलेली नसल्यामुळे रुग्णाची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा तालुका जंगली व आदिवासी भाग असल्यामुळे परिसरातील घाणीचे साम्राज्य असल्यामुळे डासांची मोठी पैदास होऊन मलेरिया, डायरिया, ग्रॅस्टो या सारखे आजार होत असून रुग्ण मोठया संख्येने रुग्णालयात दाखल होत असतात त्यावेळी रुग्णांना वेळेवर उपचार व औषध मिळत नसल्यामुळे रुग्ण दगावत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयातील रिक्त जागा भरण्याबाबत सन २०१२ ते २०१६ पर्यंत अनेक वेळा आरोग्य विभाग, विक्रमगड तसेच आरोग्य विभाग, मंत्रालय येथे निवेदने देऊनही आजपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णालयातील रिक्त जागा भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

वैद्यकीय अधिकाऱ्यांची ४ पैकी २ पदे भरलेली आहेत व इतर कर्मचाऱ्यांची १४ पदे भरली आहे. उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना आरोग्य सेवा दिली जात आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तसेच गट-क व ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही जिल्हापरिषद स्तरावर करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरी ( जि.परभणी ) येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकिय अधिका-यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१५) ७९२९५ (१८-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरी (जि.परभणी) येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात अधिकाऱ्याची पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तदनुसार उक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सद्यस्थितीत ग्रामीण रुग्णालय बोरी, जि.परभणी येथे वैद्यकीय अधिकारी संवर्गाची एकुण तीन पदे मंजुर असुन तीन पदे भरलेली आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील वेरुळजवळील शार्दुलवाडीतील नागरिक सांधेदुखीने त्रस्त असल्याबाबत**

**(१६) ७९६५१ (१५-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील वेरुळजवळ असलेल्या शार्दुलवाडी येथील नागरिक सांधेदुखीने त्रस्त झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर गावातील प्रत्येक घरामध्ये सांधेदुखीचे रुग्ण आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर गावातील उदरनिर्वाह शेतीवर चालतो पंरतू त्यांना झालेल्या या आजारामुळे अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, शासनाने याबाबत तातडीने उपचार सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

औरंगाबाद जिल्हयात वेरुळजवळील शार्दुलवाडी गावांमध्ये माहे जानेवारी वा त्यादरम्यान चिकुनगुनिया, डेंग्यु अथवा हिवताप अशा व इतर कोणत्याही किटकजन्य आजाराचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही किंवा मृत्यू झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०१७ मध्ये तापाचे ३ रुग्ण आढळून आले होते. परंतु, त्यांचे रक्तनमूने तपासणी केली असता ते हिवतापासाठी दुषित आढळून आलेले नाहीत. तसेच, सदर गावात सांधेदुखीचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) किटकजन्य आजार नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना नियमितपणे राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात व्यक्तींची तपासणी न करता स्वास्थ्य प्रमाणपत्र देण्यात येत असल्याबाबत**

**(१७) ७९९५८ (१८-०४-२०१७). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात पोलीस, सैन्य दलात तसेच इतर शासकीय खात्यांमध्ये विविध कारणांसाठी स्वास्थ्य प्रमाणपत्र देण्याकरीता कोणत्याही व्यक्तींची तपासणी न करता रु. ३७५ रुपयांमध्ये प्रमाणपत्र देत असल्याची बाब नुकतीच माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान सामाजिक कार्यकर्त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीअंती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सातारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये आवश्यक त्या सर्व प्रकारच्या चाचण्या/तपासण्या केल्या जातात. त्याची वैद्यकिय तज्ञांकडून पडताळणी केली जाते. त्यानंतरच विविध कारणांसाठी शासकीय नियमानुसार शुल्क आकारुन स्वास्थ्य प्रमाणपत्र देण्यात येते.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौ.वाशी (जि.उस्मानाबाद) येथील ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळणेबाबत

**(१८) ८३४६५ (२०-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाशी (जि.उस्मानाबाद) येथील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, शासनाने या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्यासंबंधी जोडबृहत आराखडा तयार करण्यात येत असून, वाशी येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी, निकषानुसार तपासून एकत्रित जोडबृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(१९) ८८९६८ (१२-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. ५१६ (१५)

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे असल्यामुळे रुग्णांना उपाचारासाठी स्वखर्चाने खासगी रुग्णालयात जावे लागत असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर रुग्णालयांतील वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इचलकरंजी नगरपालिकेच्या इंदिरा गांधी मेमोरीयल हॉस्पीटलमधील कर्मचाऱ्यांचे वेतन थकल्याबाबत**

**(२०) ९०९२८ (१९-०८-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी नगरपालिकेच्या इंदिरा गांधी मेमोरीयल हॉस्पीटलचे नगरविकास विभाग शासन निर्णय दिनांक ३० जून, २०१६ रोजीच्या निर्णयाद्वारे सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयात कर्मचाऱ्यांच्या समावेशनाबाबत स्वयंस्पष्ट आदेश असतानाही कर्मचाऱ्यांचे समावेशन मुदतीत न केल्यामुळे हॉस्पीटलमधील ७० कर्मचाऱ्यांचे वेतन थकीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समावेशन मुदतीत न करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जुन, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील मागणीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१७ जानेवारी, २०१८ च्या व दि.१७.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये इचलकरंजी नगरपरिषदेचे इंदिरा गांधी मेमोरिलय हॉस्पिटलमधील ६७ कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांचे इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयात समावेशन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. उर्वरित ३ अधिकारी/कर्मचारी हे इचलकरंजी नगरपरिषदेच्या इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटलच्या आस्थापनेवरील आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील आरोग्य विभागाअंतर्गत वैद्यकीय अधिकारी व तत्संबंधी पदे भरण्याबाबत**

**(२१) ९११९१ (१२-०८-२०१७). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रूग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, दवाखाने इत्यादी विभागातील पदे रिक्त असल्याने रायगड जिल्ह्यातील रूग्ण सेवेवर विपरित परिणाम झाला असल्याबाबत अनेक तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाकडील वैद्यकीय अधिकारी तसेच तत्संबंधी असलेली पदे तातडीने भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमधील रिक्त असलेली पदे भरणेबाबत वृत्तपत्रात तसेच लोकपतिनिधी यांनी निवेदने सादर केलेली आहे.

रायगड जिल्ह्यात १ जिल्हा रुग्णालय, ५ उपजिल्हा रुग्णालये, ९ ग्रामीण रुग्णालये व ५२ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत.

रायगड जिल्हातील रुग्णालयांमध्ये गट-अ ते गट -ड संवर्गाची एकुण ९६६ पदे मंजूर असून ६३३ पदे भरलेली व ३३३ पदे रिक्त आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी संवर्गाची एकुण १३१ पदे मंजूर असून ९३ पदे भरलेली व ३५ पदे रिक्त आहेत. सदर आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध अधिकारी / कर्मचारी यांच्यामार्फत रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णांना आवश्यक त्या आरोग्य सेवा तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येते.

(२) वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे-५४००) संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितिस अधिकार देण्यात आलेले आहे. जिल्हाधिकारी यांच्यास्तरावरुन तसेच शासन स्तरावरुन स्वतंत्र निवड मंडळामार्फत वैद्यकीय अधिकारी गट-अ (पे बॅन्ड १५६००-३९१०० + ग्रेड पे ५४००) या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आष्टी (जि. वर्धा) तालुक्यातील ग्रामीण रूग्णालयात सोयीसुविधांचा अभावा असल्याबाबत**

**(२२) ९१४८४ (१९-०८-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि. वर्धा) तालुक्यातील ग्रामीण रूग्णालयाची इमारत बांधून तयार झाली असंताना सुध्दा अघापही पुरेसा कर्मचारी वर्ग व वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली नाही तसेच तेथे यंत्रसामुग्रीचा अभाव असल्यामुळे ३० खाटांचे ग्रामीण रूग्णालय सर्व सोयीने युक्त व्हावे याकरीता लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) :** (१) मा. मुख्यमंत्री कार्यालय / सार्वजनिक आरोग्य विभागाला सदर निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) ग्रामीण रुग्णालय, आष्टी जि.वर्धा येथे १५ मंजूर पदे पुढीलप्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१ | १ | ० | १ |
| २ | वै.अ. वर्ग-२ | ३ | ३ | ० |
| ३ | अधिपरिचारिका | ७ | ७ | ० |
| ४ | क्ष-किरण तंत्रज्ञ | १ | ० | १ |
| ५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १ | ० | १ |
| ६ | औषधी निर्माण अधिकारी | १ | ० | १ |
| ७ | प्रयोगशाळा सहाय्यक | १ | ० | १ |
| | एकूण | १५ | १० | ५ |

सद्यस्थितीत या रुग्णालयात रुग्णसेवा क्ष किरण तंत्रज्ञाची तात्पुरती सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

शासनाचा शासन निर्णय दि.२४/१०/२०१७ रोजी यंत्रसामुग्री व साधन सामुग्री खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार हाफकीन बायो फार्मास्युटीकल्स यांचेकडून खरेदी प्रक्रियेनुसार ग्रामीण रुग्णालय आष्टी, जि.वर्धा यांना यंत्रसामुग्री व साधन सामुग्रीचा पुरवठा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्य कामगार विमा महामंडळ, अंधेरी (मुंबई) या रुग्णालयातील व्यवस्थापन समितीच्या गैरकारभाराबाबत**

**(२३) ९३९२१ (१९-०८-२०१७). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य कामगार विमा महामंडळ रुग्णालय, अंधेरी (मुंबई) या रुग्णालयातील कर्मचारी संघटना यांनी माहे जून, २०१७ च्या चौथ्या आठवडयात ६ दिवस रुग्णालयाच्या व्यवस्थापन समितीच्या गैरकारभाराबाबत संप केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) राज्य कामगार विमा महामंडळ रुग्णालय अंधेरी हे राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत चालविण्यात येणारे आदर्श रुग्णालय आहे. त्यानुषंगाने सदर प्रश्न स्थानिक पातळीवर राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या सल्ल्याने सोडविण्यात आला व त्यानुषंगाने सदर संप मागे घेण्यात आला असे राज्य कामगार विमा महामंडळाच्या स्थानिक कार्यालयाने कळविले आहे.

---

**राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेने रक्त व रक्तघटकांसाठी आकारायचे शुल्क व प्रक्रिया चाचणी शुल्कासंदर्भाबाबत**

**(२४) ९५९७६ (२७-१२-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेने रक्त व रक्तघटकांसाठी आकारायचे शुल्क व प्रक्रिया चाचणी शुल्कासंदर्भात लागू केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार शासकीय तसेच खाजगी रक्तपेढयांसाठी शुल्क निश्चित करुन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असे असतांनाही राज्यात खाजगी व सार्वजनिक रक्तपेढयांमध्ये रक्ताचे दर वेगवेगळे असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार शुल्क निश्चितीनुसार शुल्क न आकारणा-या खाजगी व सार्वजनिक रक्त पेढयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
दिनांक २४.०९.२०१७ च्या दैनिक महाराष्ट्र टाईम्स मध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.
(३) नाही.
सदर बातमीमध्ये कोणत्याही रक्तपेढीच्या नावाचा उल्लेख नव्हता.तसेच राज्य रक्त संक्रमण परिषदेस अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नव्हती. बातमी संदिग्ध असल्यामुळे चौकशी करण्यात आली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तोंडगाव, (ता.चांदूरबाजार, जि. अमरावती) येथील आरोग्य उपकेंद्रांच्या दुरवस्थेबाबत**

**(२५) ९७२३६ (२७-१२-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तोंडगाव, (ता.चांदूरबाजार, जि. अमरावती) येथे लाखो रुपये खर्चून आरोग्य उपकेंद्र सुरु करण्यात आले परंतु तेथील वैद्यकीय अधिकारी व आरोग्य सेविकांच्या अनियमित उपस्थितीमुळे ग्रामीण भागातील वाढती रोगराई, महिलांचे बाळंतपण व वेळेच्या आत आरोग्य सुविधा रुग्णांना मिळत नसल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आरोग्य केंद्राचा लाभ रुग्णांना मिळत नसल्याने त्यांना अचलपूर, चांदूरबाजार किंवा परतवाडा येथे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील आरोग्य उपकेंद्राची समस्या सोडविण्याबाबत शासनपातळीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

उपकेंद्र तोंडगाव हे प्राथमिक आरोग्य केंद्र आसेगाव च्या अंतर्गत येत असून प्राथमिक आरोग्य केंद्र आसेगाव येथे २ वैद्यकीय अधिका-यांची मंजूर पदे भरलेली आहेत. तसेच उपकेंद्र तोंडगाव येथे आकृतीबंधानुसार १ आरोग्य सेवक, १ आरोग्य सेविका व १ कंत्राटी आरोग्य सेविका कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

उपकेंद्र तोंडगाव येथील आरोग्य सेविका व आरोग्य सेवक मुख्यालयी राहून ग्रामस्थांना नियमित आरोग्य सेवा पुरवितात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे धाड (ता.जि. बुलढाणा) येथील ग्रामीण रूग्णालयातील रिक्त पदे भरणेबाबत**

**(२६) ९९४३९ (०२-०१-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धाड (ता.जि.बुलढाणा) येथे ३० खाटाचे ग्रामीण रूग्णालय असुन वैदयकीय अधिकाऱ्याचे पद रिक्त आहे. तसेच दंततज्ञ व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांची पदे सुध्दा रिक्त

असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्यापपर्यंत कुठलीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२७-१२-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.
सदर रुग्णालयास वैद्यकीय अधिक्षकाचे १ पद मंजूर असुन ते रिक्त आहे. तथापि, वैद्यकीय अधिकारी संवर्गाची ३ पदे मंजुर असुन तीनही पदे भरलेली आहेत. दंतशल्यचिकित्सक १ पद मंजूर असुन ते रिक्त आहे. जि.श.चि. बुलढाणा यांच्या आस्थापनेवरील दंतशल्यचिकित्सक व दंत आरोग्यक हे आठवड्यातुन दोन दिवस ग्रामीण रुग्णालय धाड येथे उपस्थित राहून रुग्णांना सेवा देतात. प्रयोगशाळा तंत्रज्ञाचे १ पद मंजूर असुन ते भरलेले आहे. सद्यस्थितीत उपलब्ध अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून रुग्णांना आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.
(२) म.वै.आ.से. गट-अ संवर्गातील नामनिर्देशनाची व पदोन्नतीची रिक्त पदे भरणेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच गट-क संवर्गाच्या भरतीबाबत कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात प्रयोगशाळा तंत्रज्ञाची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२७) १००१८४ (०६-०१-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागातील रिक्त जागांपैकी ७५ टक्के जागा भरतीची परवानगी वित्त विभागाने दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने संचालक, आरोग्य सेवा व सहसंचालक, आरोग्य सेवा हिवताप, पुणे यांनी सन २०१६ मध्ये प्रयोगशाळा तंत्रज्ञ व आरोग्य सेवक गट 'क' व क्षेत्रीय कर्मचारी गट 'ड' ही पदे भरण्याची परवानगी मिळालेली असतांनाही त्यांनी आरोग्य सेवक व क्षेत्रीय कर्मचारी ही पदे भरली असून प्रयोगशाळा तंत्रज्ञाची पदे भरली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात प्रयोगशाळा तंत्रज्ञाचे सरासरी ६०० पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत कार्यवाही न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय.
(४) व (५) प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी संवर्गाची बिंदू नामावली नोंदवही तपासण्याची कार्यवाही सुरु असून त्याला मान्यता मिळाल्यानंतर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**अंजनगाव सुर्जी (जि. अमरावती) येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत**

**(२८) १००१९७ (०४-०१-२०१८). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकार्यांची पदे रिक्त असल्याने अनेक रुग्णांची गैरसोय होते, हे खरे आहे काय,
(२) तसेच, तेथे केवळ ३० खाटांची सोय असल्याने रुग्णाची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंजनगाव सुर्जी येथील ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालय कधीपर्यंत होणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२७-१२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) शासन निर्णय दि.१३.०७.२०१८ अन्वये ग्रामीण रुग्णालय अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती चे श्रेणीवर्धन करण्यात येऊन तेथे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय सुरु करण्यात मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**दौंड ( जि. पुणे) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन**
**करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असलेबाबत**

**(२९) १०१८९८ (०४-०१-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि. पुणे) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटामध्ये श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव सहसंचालक आरोग्य सेवा महाराष्ट्र राज्य यांचेकडे अनेक दिवसापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी पूर्वीचे ५० खाटांचे रुग्णालय असून, सद्यस्थितीला फक्त ३० खाटा बसू शकतील एवढीच इमारत अस्तित्वात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावावर कार्यवाही करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हेही खरे आहे काय
(४) असल्यास, सदर प्रस्ताव मार्गी लावणेबाबत तसेच अपुरी असलेली इमारत बांधकाम करणेबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजीचे निवेदन निर्देशनास आलेले नाही. तथापी दि. १४/०२/२०१८ रोजीच्या निवेदना द्वारे स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागणी केलेली आहे.

त्यानूसार उपजिल्हा रुग्णालय दौंड जिल्हा पूणे या ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयांचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास “विशेष बाब” म्हणून दिनांक १२/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही

---

**लोहारा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(३०) १०२४२८ (०४-०१-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहारा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात तज्ञ वैद्यकीय अधिकारी व सोयी-सुविधांचा अभाव असल्याने गंभीर आजारांवरील शस्त्रक्रिया करण्यासाठी या रुग्णांना सोलापूर, उस्मानाबाद येथील खाजगी रुग्णालयात हलवावे लागते आहे, परिणामी रुग्णाच्या नातेवाईकांना आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोहारा येथील विविध राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी व संघटनांनी निवेदनाद्वारे रुग्णालयातील स्त्री रोग तज्ञ व अन्य रिक्त पदांची भरती करणेबाबत कळविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरविषयी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.
ग्रामीण रुग्णालय, लोहारा, जि.उस्मानाबाद येथे वैद्यकीय अधिक्षकासह १ बालरोग तज्ञ, १ स्त्रीरोग तज्ञ व १ भुल तज्ञ अशी ४ पदे मंजूर आहेत. सद्य:स्थितीत चारही पदे भरलेली असल्याने आरोग्य सेवा व्यवस्थितपणे सुरु आहे.
(२) हे खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, लोहारा येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी लोहारा यांनी दि.२०.११.२०१७ रोजी निवेदन देऊन कळविले आहे.

(३) ग्रामीण रुग्णालय लोहारा येथे विशेषज्ञांची पदे भरण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातपूर (जि.नाशिक) येथील शाकुंतल सोनोग्राफी डायग्नोस्टिक सेंटरबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी

**(३१) १०५२७८ (०७-०४-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाने त्यांच्याकडे आलेल्या असंख्य तक्रारीनुसार तसेच "आमची मुलगी" या उघडलेल्या संकेतस्थळावर डॉ.तुषार पाटील यांच्या सातपूर येथील एमएचबी कॉलनी मधील शाकुंतल डायग्नोस्टिक सेंटरवर छापा टाकला असता सोनोग्राफी ऑन व्हिल्स सुरु असल्याची बाब दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाकुंतल डायग्नोस्टिक सेंटरकडून इनोव्हा गाडीत सोनोग्राफी सेंटर सुरु असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून या सर्व प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पाटील यांचेकडे याबाबतच्या अनेक लेखी तक्रारी जिल्हयातील नागरिकांनी वारंवार करुनही संकेतस्थळावर सदर तक्रारी केल्याचे जिल्हा शल्यचिकित्सकांना आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार शाकुंतल डायग्नोस्टीक सेंटरवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) होय हे खरे आहे.

(४) होय. सदर सेंटरची नोंदणी निलंबित करुन सोनोग्राफी मशीन सील केले आहे, व संबंधित डॉक्टर विरुध्द न्यायालयात दावा क्र.आर.सी.सी. क्र.१७९/२०१८ दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नगरसूल (ता.येवला,जि.नाशिक) येथील ग्रामीण रुग्णालय इमारत व कर्मचारी निवासस्थानांमधील कामांचे अंदाजपत्रके व आराखडे मंजुरीबाबत**

**(३२) १०५७४७ (०६-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरसूल (ता.येवला, जि.नाशिक) येथील ग्रामीण रुग्णालय इमारत व कर्मचारी निवासस्थानांमधील कामांचे अंदाजपत्रके व आराखडे उपसंचालक, आरोग्य सेवा नाशिक मंडळ यांनी आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचेकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मंजुरीसाठी पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात हाय डिपेंन्डेसी ॲन्ड ऑब्सेट्रिक इंटेसिव्ह केअर युनिट स्थापन करण्याचा निर्णय**

**(३३) १०७६८३ (०७-०४-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माता मृत्यु कमी करण्यासाठी व सुरक्षित बाळंतपणासाठी नाशिकसह, ठाणे, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, नांदेड, अकोला आणि नागपूर येथे हाय डिपेंन्डेसी ॲन्ड ऑब्सेट्रिक इंटेसिव्ह केअर युनिटची स्थापना करण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनसार राज्य शासनाच्या कुटुंब कल्याण विभागाने प्रस्ताव तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने तयार केलेल्या प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, शासन तयार केलेल्या प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाने मान्यता दिली असल्यास, किती शहरात युनिट सुरु करण्यांत आले आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे

सन २०१८-१९ या करिताच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार राज्यातील मुंबई, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, अकोला, नांदेड, वर्धा,

अमरावती, जळगांव व गोंदिया अशा १० जिल्ह्यातील निवडक आरोग्य संस्थांमध्ये हाय डिपेंन्डेसी ॲन्ड ऑब्सेट्रिक इटंसिव्ह केअर युनिट प्रस्तावित करण्यात आले आहे. नाशिक जिल्ह्यात माता व बाल आरोग्य कक्ष मंजूर असून त्यामध्ये हाय डिपेन्डेंसी ॲन्ड ऑब्सेट्रिक इटंसिव्ह केअर युनिट समाविष्ट आहे.

(२), (३) व (४) या संदर्भात केंद्र शासनास सादर करण्यात आलेल्या सन २०१८-१९ च्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडयामध्ये वरील जिल्ह्यातील निवडक संस्थांमध्ये हाय डिपेन्डेंसी ॲन्ड ऑब्सेट्रिक इटेंसिव्ह केअर युनिट करिता विस्तारीकरण, मनुष्यबळ व आवश्यक उपकरणे व संयंत्रे खरेदीकरीता अनुदान प्रस्तावित करण्यात आले आहे. केंद्र शासनाकडून अद्याप सदर प्रस्तावित प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यास मान्यता मिळालेली नाही.

---

**नेवासाफाटा (जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयातील दुरवस्थेबाबत**

**(३४) १०८१९१ (०५-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासाफाटा (जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयात अनेक महिन्यापासून वैद्यकिय अधिकारी, परिचारिका यांची वेळेवर उपस्थिती नसल्याने तेथील रुग्णांचे उपचाराविना गैरसोय होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

नेवासफाटा येथील ग्रामीण रुग्णालयात सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ४ ते ६ या काळात बाह्यरुग्ण विभाग सुरु असून, या ठिकाणी दोन्ही वेळेला नियमितपणे रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहे. वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी हे निवास्थानात राहत असून, नेवासफाटा येथील ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुगणालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णांवर औषधेपचार करण्यात येतो.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण (जि.सातारा) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या श्रेणीवर्धन प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत**

**(३५) १०८७७९ (०१-०४-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्याच्या ठिकाणी सुमारे ७० ते ८० गांवाकरीता राज्य शासनाने ग्रामीण रुग्णालय उभारले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण रुग्णालयात या विभागातील सुमारे ७० ते ८० गांवातील व वाडया वस्त्यांमधील रुग्ण औषोधोपचाराकरीता येत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रुग्णालयातीस वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांच्या कमतरतेमुळे
रुग्णालयात औषधोपचाराकरीता येणाऱ्या रुग्णांची मोठी गैरसोय होत असल्याने या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन या रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालय असा दर्जा देऊन त्याठिकाणी वैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचारी संख्या वाढविणेबाबतचा प्रस्ताव ग्रामीण रुग्णालयाने जिल्हा रुग्णालयाच्या मार्फत राज्य शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्ताव तपासण्यात येत आहे असे नमुद केले असून यावर राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे
(५) अद्यापही या संदर्भात निर्णय घेतला नसल्यास सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) वैद्यकीय अधिकारी यांच्या कमतरतेमुळे रुग्णालयात औषधोपचाराकरीता येणाऱ्या रुग्णांची मोठी गैरसोय होते. हे खरे नाही.

सन २०११ च्यालोकसंख्येवर आधारित आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्यासंबंधी जोडबृहत आराखडा तयार करण्यात येत असून, पाटण येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी, निकषानुसार तपासून एकत्रित जोडबृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्हयात शासकीय महाविद्यालयाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३६) ११२४९२ (०१-०४-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात रुग्णांसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबतचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी काम पुर्ण करण्याचे आश्वासन देवूनही अदयाप काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, शासनाने निर्णय घेवून व निधीची तरतूद करुन येथील वैद्यकीय कॉलेजचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१५-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) वै.शि.व औ.द्रव्ये विभाग, शासन निर्णय, दिनांक २२ जून, २०१८ अन्वये सातारा येथील मंजूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ, पुणे यांची कृष्णानगर, सातारा येथील २५ एकर जागा कायमस्वरुपी हस्तांतरित करण्यात मान्यता देण्यात आली आहे. सदर जागेच्या हदद् निश्चितीचे काम सुरु असुन हदद् निश्चिती होताच जागा ताब्यात मिळेल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील सेंट जॉर्ज रुग्णालयातील कामगार संघटनेने व जे.जे रुग्णालयामध्ये डॉक्टरांनी केलेल्या आंदोलनामुळे रुग्णांची झालेली गैरसोय**

**(३७) ११७९९८ (०१-०८-२०१८). श्री.संजय पोतनीस (कलिना), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सेंट जॉर्ज रुग्णालयातील कामगार संघटनेने ऐन गर्दीच्या वेळेत अचानक दोन तास संप घडवून आणल्यामुळे रुग्णांची गैरसोय झाली परंतु रुग्णालय प्रशासनाच्या सर्तकतेमुळे व सर्व डॉक्टर कामावर असल्याने कोणत्याही प्रकारची विपरीत घटना घडली नसल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबईतील जे.जे रुग्णालयामध्ये मृत्यू झालेल्या रुग्णाच्या नातेवाईकांनी डॉक्टरांना केलेल्या मारहाणीच्या निषेधार्थ निवासी डॉक्टरांनी माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान "काम बंद" आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनेच्या निषेधार्थ जे.जे. समूहातील डॉक्टरांनी काम बंद केलेल्या आंदोलनाला जी.टी. हॉस्पिटल, कामा रुग्णालय, सेंट जॉर्ज रुग्णालयातील ४५० हून अधिक निवासी डॉक्टरांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सेंट जॉर्ज रुग्णालयातील कामगार संघटना व जे.जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या काम बंद आंदोलनामुळे रुग्णसेवेवर परिणाम झाला असल्याने सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०१-२०१९) :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

(४) सेंट जॉर्ज येथे घडलेल्या प्रकरणी संस्थाप्रमुखांनी संबधितांशी चर्चा केल्याने तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी केलेले कामबंद आंदोलन त्वरीत मागे घेण्यात आल्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही.

जे.जे. समुह रूग्णालय, मुंबई येथे घडलेल्या प्रकाराची चौकशी संस्थास्तरावर करण्यात आली असून सदर चौकशीत रूग्ण कक्षात अनावश्यक नातेवाईक असल्याचे आढळून आले आहे. तसेच महाराष्ट्र राजय सुरक्षा रक्षक व ज.जी. समुह रूग्णालयातील नियमित सुरक्षारक्षक यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे.
(५) सेंट जॉर्ज येथे घडलेल्या प्रकरणी कर्मचारी संघटनेच्या मागण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

सर जे.जे.समुह रूग्णालय, मुंबई येथे घडलेल्या प्रकाराची चौकशी केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार रूग्णालयामध्ये दोन पेक्षा अधिक नातेवाईकांना प्रतिबंध करण्यात आला आहे. रूग्णालयीन कक्षामध्ये आलार्म सिस्टिम बसविण्याबाबतची कार्यवाही रूग्णालय प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. तसेच निवासी डॉक्टरांच्या मागणीनुसार अतिरिक्त सुरक्षा बल तैनात करण्याकरिता कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात केंद्रीय श्रम मंत्रालयामार्फत राबविण्यात येणारी राष्ट्रीय स्वास्थ विमा बंद असल्याबाबत

**(३८) ११८८०० (२८-०७-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्रीय श्रम मंत्रालयामार्फत राबविण्यात येणारी राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना गत ३ वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामागील कारणे काय आहेत,

(३) तसेच, राज्यशासन आयुष्यमान भारत योजनेची सुरुवात केव्हापासून करणार आहे व या योजनेत महात्मा फुले आरोग्य विमा योजनेचा समाविष्ट करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१), (२) व (३) दिनांक १.०४.२०१५ पासून राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाकडून केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे हस्तांतरीत करण्यात आली. केंद्र शासनाकडून राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना राबविण्याच्या अनुषंगाने धोरण ठरविण्याची कार्यवाही सुरू होती.

केंद्र शासनाने राष्ट्रीय स्वास्थ विमा योजनेचे रूपांतर प्रधानमंत्री जन आरोग्य योजनमध्ये करून सदर योजना दिनांक २३.०९.२०१८ पासून राबविण्याच्या निर्णय घेतला. त्यास अनुसरून शासन निर्णय दिनांक २१.०९.२०१८ नुसार प्रधानमंत्री जन आरोग्य योजना महात्मा ज्योतिबा

फुले जन आरोग्य योजनेसह दिनांक २३.०९.२०१८ पासून पहिल्या टप्प्यामध्ये राज्यातील शासकीय रूग्णालयामध्ये सुरू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात आरोग्य विभागाकडून जोखीमग्रस्त गावांमध्ये प्रतिबंधक उपाययोजना आखण्याबाबत**

**(३९) ११८९८६ (०१-०८-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात पावसाळ्यात उद्भवणा-या साथीच्या आजारांवर मात करण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाकडून जिल्ह्यातील आठही तालुक्यातील १५२ गांवे जोखिमग्रस्त गावे म्हणून निश्चित करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये लेप्टोस्पायरोसिसची दरवर्षी येणारी साथ व पूर येणा-या किती गावांचा समावेश आहे,

(३) असल्यास, या सर्व गावांमध्ये कोणती प्रतिबंधक उपाययोजना आखण्यात आली आहे व इतर कोणत्या उपाययोजना व सुविधा कार्यरत करण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, या उपाययोजना व सुविधांची अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे व यासाठी तालुका प्राथमिक आरोग्य केंद्रात व उपकेद्रामध्ये आवश्यक असलेल्या किती प्रकारच्या औषधांचा समावेश करण्यात येणार आहे व यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) यामध्ये लेप्टोस्पायरोसीस-७७ गावे व पूर येणारी-५३ गावांचा समावेश आहे.

(३) सदर अतिजोखमीच्या गावात खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत-

- नियमित साथरोग सर्वेक्षण
- अतिजोखमीच्या व्यक्तींना लेप्टोसाठी प्रतिबंधात्मक उपचार
- उपकेंद्र स्तरावर पुरेसा औषध साठा
- कृषी, पशुसंवर्धन, आरोग्य विभागाच्या समन्वयाने लेप्टोप्रतिबंधासाठी आरोग्य शिक्षण
- साथरोग सर्व्हेक्षणासाठी गाव पातळीवर आशा कार्यकर्त्याचा सहभाग.

(४) साथरोग नियंत्रण ही नियमित बाब असून पावसाळा पूर्व तयारी १५ मे पासून सुरु झाली आहे.सर्व आरोग्य संस्थांमध्ये ताप तसेच जलजन्य आजारांसाठी आवश्यक सर्व औषधांची किट उपलब्ध ठेवणेबाबत सर्व संबंधितांना सूचित करण्यात आले आहे.यासाठी राज्य व जिल्हा स्तरावरील नियमित निधीचा विनियोग करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील ० ते १८ वयोगटातील मुलांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(४०) ११९१३५ (०१-०८-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयामध्ये प्रत्येक वर्षात ० ते १८ या वयोगटातील मुलांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण वाढत असून सन २०१३ ते २९१८ या पाच वर्षाच्या कालावधीत जिल्हा परिषदेच्या शाळा, अंगणवाडी आणि अनुदानित शाळांमधील १ हजार ७१ मुले हृदयविकाराने ग्रस्त असल्याचे दि. ३० एप्रिल,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या हृदयरोगग्रस्त मुलांवर तातडीने उपचार करण्यासाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) :** (१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरणी शासनाने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

१) ० ते १८ वयोगटातील ११७१ मुले ह्दयरोगी असल्याचे आढळून आले. त्यापैंकी, ७८९ बालकांवर शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

२) १०५ मुले वैद्यकीय उपचार घेत आहेत.

३) ७ मुलांची Cardiac Cath तपासणी करण्यात आली.

४) ९ मुलांवरील शस्त्रक्रियेचा खर्च प्रत्येकी १.५ लाखांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे धर्मादाय रुग्णालय रुबी हॉल क्लिनिक, पुणे आणि बुधराणी हॉस्पीटल, पुणे यांचेकडे प्रस्ताव पाठविला आहे.

५) १० मुलांच्या ह्दय शस्त्रक्रियेच्या प्रस्तावाची नोंदणी महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत केलेली असून लवकरच त्यांच्या ह्दय शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहेत.

उर्वरित मुलांमध्ये खालील बाबी आढळून आल्या आहेत.

अ) ४४ मुलांचे पालक शस्त्रक्रिया करुन घेण्यास तयार नाहीत.

ब) ५६ मुलांना शस्त्रक्रियेची आवश्यकता नाही.

क) ३२ मुलांच्या शस्त्रक्रिया या अतिजोखमीच्या व अशक्य आहेत.

ड) १९ मुले स्थलांतरीत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयात प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रास मंजूरी मिळणेबाबतचे प्रस्ताव प्रस्तावित असल्याबाबत**

**(४१) १२०१९३ (२५-०७-२०१८). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील लऊळ, घोटी, उजनी (मा.) (ता.माढा) व पिराची कुरोली (ता.पंढरपूर) यासह इतर प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रास मंजूरी मिळणेसाठीचा प्रस्ताव जिल्हा परिषद,सोलापूर यांनी राज्य शासनाकडे पाठविलेला असून मागील तीन वर्षापासून त्यास मंजूरी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील गोरगरीबांना आरोग्य सुविधा पुरविणेच्या दृष्टीने उक्त प्रस्तावांना मंजूरी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही
नवीन रुग्णालयांना मान्यता देणे व कार्यान्वीत रुग्णालयांचे श्रेणी वर्धन करणे याबाबत सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही संचालक, आरोग्य सेवा यांचे स्तरावर सुरु असून सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे सुरु करण्याची मागणी निकषानुसार बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**पालघर जिल्हयातील ग्रामिण भागातील नागरिकांना गॅस्ट्रोच्या साथीची लागण झाल्याबाबत..**

**(४२) १२०८९८ (०६-०८-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंदवली (ता.वाडा, जि.पालघर) गावातील वांगणपाडा, टोकरेपाडा व डोंगरपाडा या तीन पाड्यातील सुमारे ३५ नागरिकांना गॅस्ट्रोच्या साथीची लागण झाल्यामूळे एका महिलेचा मृत्यू व दुस-या महिलेची प्रकृती गंभीर असल्याची घटना तसेच मोखाडा तालुक्यातील चिंचुतारा या गावात ४० पेक्षा अधिक नागरीकांना गॅस्ट्रोची लागण झाल्याची घटना माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णावर ग्रामिण रुग्णालयात योग्य ते उपचार योग्य वेळी मिळाले नाहीत व रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध झाली नाही तसेच सदर परिसरात स्वच्छ पाणीपुरवठा होत नसल्याचे देखील निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गॅस्ट्रोच्या साथीने मृत पावलेल्या महिलेच्या कुटुंबास व प्रकृती गंभीर असलेल्या महिलेस शासनाने आर्थिक मदत केली आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार पालघर जिल्हयातील ग्रामिण भागातील आरोग्य सेवा सुधारणयाबाबत व गॅस्ट्रोची साथ आटोक्यात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१७-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
चेंदवली गावात सदर कालावधीत गॅस्ट्रो आजाराची १९ जणांना लागण झाली. मोखाडा तालुक्यातील चिंचुतारा गावात या कालावधीत एकूण ५९ जणांना अतिसाराची लागण झाली. एक मृत्यू दृदय रोगाने झाला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
चिंचुतारा येथून रुग्णांना संदर्भ सेवा देतांना रुग्ण वाहिका उपलब्ध करुन देण्यात आली होती .
(३) चेंदिवली येथील महिलेचा मृत्यू साथरोगामुळे झालेला नसुन हृदय रोगामुळे झाला आहे. सबब आर्थीक मदत देण्याचा प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) चेंदवली आणि चिंचुतारा येथील जलजन्य आजारांचे उद्रेक नियंत्रणासाठी खालील उपाययोजना करण्यात आल्या.

- रुग्णांचे घरोघर जाऊन सर्वेक्षण.
- गावात विशेष कक्ष उघडून उपचार.
- पाणी शुध्दीकरण व गुणवत्ता नियंत्रण.
- गंभीर रुग्णांसाठी संदर्भ सेवा.
- पाणी शुध्दीकरणासाठी घरोघर मेडीक्लारचे वाटप.
- रुग्ण सहवासितांसाठी उपचार.
- परिसर स्वच्छता व जनतेचे आरोग्य शिक्षण.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपुर (जि. सोलापुर) तालूक्यातील १८ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेन्द्राना आय.एस.ओ. प्रमाणपत्र देण्यात आल्याबाबत**

**(४३) १२१०५३ (२८-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपुर (जि.सोलापुर) तालूक्यातील १८ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेन्द्राना आय.एस.ओ. प्रमाणपत्र देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त १८ प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक मुलभुत सोई सुविधा उपलब्ध नसून डॉक्टर व कर्मचारी यांच्याकडून कोणत्याही सुविधा रुग्णना योग्य रित्या देत नसतानाही आय.एस.ओ. मानांकन देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक नागरिकानी सबंधित जिल्हा परिषद प्रशानानाकड़े वारंवार तक्रार करूनही न्याय मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे अशंत: खरे आहे
सोलापूर जिल्हयातील पंढरपूर तालुक्यातील ०२ प्राथमिक आरोग्य केंद्र व १८ उपकेंद्राना आय.एस.ओ. मानांकन देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

आय.एस.ओ.मानाकंन प्राप्त सर्व आरोग्य संस्थामध्ये आरोग्याच्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध असून या संस्थामार्फत राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविले जातात.

सदर २ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १८ उपकेंद्रे आय.एस.ओ.चे निकषास प्राप्त झाल्याने त्यांना आय.एस.ओ. मानाकंन देण्यात आले आहे.

(३) सदर प्रकरणी उपकेंद्र फुलचिंचोली बाबत स्थानिक स्तरावर उपसरपंच, ग्रामपंचायत फुलचिंचोली ता.पंढरपूर यांचा तक्रार अर्ज तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

(४) व (५) उपकेंद्र फुलचिंचोलीची एस.व्ही.सी.एस. नेटवर्क्स सर्व्हिसेस प्रा.लि. सोलापूर या कंपनीमार्फत फेरतपासणी करण्यात आली असून त्यांनी निदर्शनास आणलेल्या त्रुटीचे निराकरण करण्याचे सूचित केले व उपकेंद्र फुलचिंचोलीची आय.एस.ओ.चे मानांकन रद्द करण्यात आले आहे

(६) प्रश्न उदभवत नाही

---

**राज्यात डेंग्यू, स्वाईन फ्ल्यु, इ. साथींवर आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(४४) १२१९८५ (०१-०८-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठया प्रमाणात डेंग्यू, स्वाईन फ्ल्यु, इ. साथींचे रोगांचे रूग्ण आढळले असून इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे डेंग्यूची हजारो व्यक्तींना लागण झाल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इचलकरंजी येथे डेंग्यू व स्वाईन फ्लु चे नमुने तपासणीसाठी प्रयोग शाळा नसल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात डेंग्यू व स्वाईन फ्ल्यु साथीला आळा घालणेसाठी व इचलकरंजी येथे डेंग्यू व स्वाईन फ्लु चे नमुने तपासणीसाठी प्रयोग शाळा उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१७-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे,
राज्यात जानेवारी ते मे २०१८, या कालावधीत डेंग्यू आणि स्वाईन फ्ल्यू आजाराचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | आजार | रुग्ण | मृत्यू |
|---|---|---|---|
| १ | डेंग्यू | ५४३ | ० |
| २ | स्वाईन फ्ल्यू | ३२ | ८ |

कोल्हापूर जिल्हा व इचलकरंजी नपप मधील जानेवारी २०१८ ते मे २०१८ या कालावधीतील डेंग्यू आणि स्वाईन फ्ल्यू आजाराचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| विभाग | रुग्ण | | मृत्यू |
|---|---|---|---|
| | डेंग्यू | स्वाईन फ्ल्यू | |
| कोल्हापूर | १०२ | २ | ० |
| इचलकरंजी | १ | ० | ० |

(२) हे खरे आहे.

तथापि, डेंग्यूच्या निश्चित निदानासाठी शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर येथे सेंटिनल हॉस्पिटलची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, तर स्वाईन फ्ल्यू नमुने तपासणीसाठी एनआयव्ही, पुणे या शासकीय प्रयोगशाळेबरोबरच रेलीगेअर आणि डॉ.लाल पॅथॉलॉजी लॅब सह इतर २५ खाजगी प्रयोगशाळांना मान्यता देण्यात आलेली आहे.

(३) साथरोगांना आळा घालण्यासाठी शासनाकडून खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात-

- साथरोगाचे नियमित सर्वेक्षण
- कीटकजन्य आजारासाठी कीटकशास्त्रीय सर्वेक्षण
- आवश्यक औषधांचा पुरेसा पुरवठा
- स्वाईन फ्ल्यू साठी अतिजोखमिच्या व्यक्तिचे लसीकरण
- रुग्ण उपचाराची सुविधा
- निदानासाठी प्रयोगशालेय सुविधा
- एकात्मिक कीटक व्यवस्थापन
- प्रभावी नियंत्रणासाठी आंतरविभागीय समन्वय
- साथरोग संदर्भात जनतेच आरोग्य शिक्षण

डेंग्यू व स्वाईन फ्ल्यू चे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळा बाबत केलेली कार्यवाही- इचलकरंजी येथील डेंग्यू रक्तजल नमुने तपासणीसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कोल्हापूर येथील सेंटीनल हॉस्पीटलची व्यवस्था स्वाईन फ्ल्यू नमूने तपासण्यासाठी शासकीय प्रयोगशाळेबरोबरच खाजगी प्रयोगशाळांना मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोसे (ता. मंगळवेढ़ा, जि.सोलापुर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये महिला रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(४५) १२२२९२ (२८-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसे (ता. मंगळवेढ़ा, जि.सोलापुर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये महिला रुग्णांच्या आरोग्याची काळजी योग्य रितीने घेत नसल्याचे दिनांक १५ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त केंद्रात दि. २४ फेब्रुवारी रोजी एका महिलेची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यानंतर रुग्णालय कर्मच्याऱ्याच्या चुकीमुळे तिची प्रकृती चिंताजनक बनल्याची घटना घडल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त विषयाबाबत आरोग्य विभागाकडे वारंवार तक्रारी करून ही अद्याप पर्यंत कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

कोणत्याही महिला रुग्णाची कुटुंब नियोजन शस्त्रकिया केल्यानंतर प्रकृती चिंताजनक झाली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यात शासकीय रुग्णालयात परिचारिका सख्या कमी असल्याबाबत**

**(४६) १२३३७६ (०६-०८-२०१८). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय नियमानुसार शासकीय रुग्णालयातील जनरल वार्डामध्ये तीन रुग्णांमागे एक परिचारिका असणे आवश्यक असताना मनुष्यबळाअभावी राज्यात शासकीय रुग्णालयात ५० रुग्णांमागे तीन परिचारिक रुग्णसेवेसाठी व रात्र पाळीला केवळ एक परिचारिका तसेच अतिदक्षता विभागात सात रुग्णांमागे एक परिचारिका रुग्णांचा सुश्रृषा करत असल्याची बाब

माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सुमारे अडीच लाखाहून अधिक परिचारिक आहेत तथापि सार्वजनिक आरोग्य विभाग व सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांत केवळ २५ हजार परिचारिका कार्यरत असल्याने अपुऱ्या मनुष्यबळामुळे राज्यातील सर्व परिचारिकांवर कामाचा अतिताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परिचारिकांना खाजगी रुग्णालयामध्ये अल्पवेतनावर काम करावे लागते तसेच त्यांना शासकीय व खाजगी रुग्णालयात कामाच्या ठिकाणी डॉक्टर, रुग्ण, रुग्णांचे नातेवाईक कंम्पाऊंडर यांच्याकडून शारिरिक, मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागते त्याचबरोबर ग्रामीण भागात दैनंदिन कामाबरोबर, लसीकरण, कुटूंब कल्याण, प्रसुती इ. कामेही करावी लागत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार परिचारिकांची रिक्त पदे तात्काळ भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडे सुमारे ७५ हजार परिचारिका नोंदणीकृत आहेत. त्यापैकी सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत २१,८४७ परिचारीका आहेत. राज्य कामगार विमा योजनेतंर्गत ५१४ परिचारिका कार्यरत आहेत. उर्वरित नोंदणीकृत परिचारीका या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिकेसह सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, अशासकीय वैद्यकीय महाविद्यालये खाजगी रुग्णालय इत्यादी ठिकाणी कार्यरत आहेत.
(३) हे खरे नाही.
याबाबत लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच ग्रामीण रुग्णालयातील परिचारीकांच्या दैनंदिनी कामात लसीकरण, कुटुंब कल्याण, प्रसुती इत्यादी कामे आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) अधिपरिचारीकांच्या रिक्त पदांसाठी दिनांक ८ जानेवारी, २०१७ व दिनांक २० मे, २०१८ रोजी भरती प्रक्रियेबाबत परिक्षा आयोजित करण्यात आली होती. रिक्त जागा भरण्याची कार्यवाही चालू आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत मंजूर निधी राज्यात प्राप्त होण्यास होत असलेला विलंब

**(४७) १२३८१० (२५-०७-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत मंजूर निधी राज्यात प्राप्त होण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानासाठी वर्षभरासाठी असलेला निधी हा शेवटच्या २-३ महिन्यामध्ये प्राप्त होत असल्याने तो निधी तातडीने खर्च करावा लागत असल्याने सदर निधी ज्या कामासाठी वापरण्यात येतो त्या कामाचा दर्जा राखण्यासाठी अधिका-यांना अत्यंत अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा मंजूर निधी त्वरीत वितरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात केंद्र व राज्य शासनाचा रु.२६४१.८२ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पीसीएनडीटी कायद्याचा भंग केल्याप्रकरणी न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या खटल्यांबाबत**

**(४८) १२३९४६ (२८-०७-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पीसीएनडीटी कायद्याचा भंग केल्याप्रकरणी न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या वर्षभरात राज्यात पीसीएनडीटी कायद्याचा भंग केल्याप्रकरणी किती खटले न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत व त्यापैकी किती खटल्यांचा निकाल अद्यापपर्यंत लागला आहे,
(३) असल्यास, सदर कायद्याचा भंग केलेल्या डॉक्टरांना न्यायालयात कठोर शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यल्प असल्यास त्याची कारणे काय आहेत, तसेच आजपर्यंत किती डॉक्टरांना या कायद्याअंतर्गत शिक्षा झाली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) व (२) होय, सप्टेंबर, २०१८ पर्यंत ५८६ खटले दाखल केले आहेत. त्यापैकी ३५० प्रकरणांचा निकाल लागला आहे.
(३) निकाल झालेल्या पैकी ९९ प्रकरणांतील ९६ जणांना सश्रम कारावासाची शिक्षा झाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक आरोग्य हिवताप व हत्तीरोग विभागातील प्रयोगशाळा वैधानिक अधिकारी संवर्गात मिळणारे लाभ व पदशृंखला यामध्ये तफावत असल्याबाबत

**(४९) १२५३४८ (०६-०८-२०१८). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य हिवताप व हत्तीरोग विभागातील प्रयोगशाळा वैधानिक अधिकारी (प्र.शा.त.) संवर्गात आश्वासित प्रगती योजनेद्वारे मिळणारे लाभ व पदशृंखला यामध्ये होणारी तफावत दूर करण्याकरिता शासनाकडे तत्कालीन आमदार, विद्यमान मुख्यमंत्री व तत्कालीन आमदार, विद्यमान वित्तमंत्री हे शासनाकडे सन २०१० पासून पत्रव्यवहार करुन सतत पाठपुरावा करीत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या परिपत्रकात अडथळा न आणता सदर परीपत्रक शिथिल करून शासन पदशृंखला व वेतन वाढीमध्ये होणारी तफावत दूर करण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप कसे असेल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) याबाबतचा प्रस्ताव सातव्या वेतन आयोग त्रुटी/सुधारणा समितीपुढे सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील वन विभागात अवैध खर्चाना मंजूरी दिल्याबाबत

**(५०) १२९९०५ (०६-१२-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील वन विभागाच्या मासीक रोखलेख्यातील फॉर्म क्र. १४ ,२५, ३४ , ३५ यांची तपासणी न करता अवैध खर्चास मान्यता देण्यात आली असल्याचे दिनांक ६ ऑक्टोंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महालेखाकारानी दरमहा वन विभागाच्या रोखलेखा व त्याचा गोषवारा (एब्स्ट्रकट) सोबत मुख्य वनसरक्षंकांना दिलेले फॉर्म नं. १४, २५, ३४, ३५ ची तपासणी न करता नियमबाह्य खर्चाना गेल्या ६० महिन्यांपासून मान्यता देत येण्यात आलेली असून या सर्व रोखलेख्यातील खर्च तथा त्यासंबधित असलेल्या सर्व फॉर्मची तपासणी करण्याची जबाबदारी ही मुख्य वनसरक्षंक तसेच प्रशासकीय अधिकारी यांची आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर बाबींकडे दुर्लक्ष करण्यात आले असून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्याअनुषंगाने संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) नियमबाहय खर्चास मंजूरी देण्यात आली हे खरे नाही.
(३) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.